**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**परिपत्रक क्रमांक-संकिर्ण-१०९६/प्र.क्र.११५/२१-अ**
**मंत्रालय,मुबंई -४०००३२,दिनांक:२७ जुन,१९९६**

पहा:- शासन परिपत्रक , ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्र.व्हीपीएम-२४७२/५६ १३१/ई,दिनांक ५ जानेवारी,१९७३

**परिपत्रक**

ग्रामपंचायतीच्या तपासणीची/निरीक्षणाची पध्दत प्रस्तावनेत नमुद केलेल्या दिनांक ५ जानेवारी,१९७३ च्या शासन परिपत्रकाव्दारे विहित करण्यात आली आहे व मुख्य कार्यकारी अधिकारी ,प्रशासकिय अधिकारी व गट विकास अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीचे निरीक्षण प्रत्येक वर्षात करावे ,याबाबतच्या सुचना त्या परिपत्रकाला जोडलेल्या जोडपत्रात नमुद केलेल्या आहेत.महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा समितीने आपल्या अहवालात अशी शिफारस केली आहे की, विभागीय आयुक्तांच्या तपासणी अहवालामध्ये पंचायत विस्तार अधिकारी ,गट विकास अधिकारी ,उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी किती ग्रामपंचायतीचे सखोल व सर्वसाधारण निरीक्षण केले ,याबाबतचा परिच्छेद समाविष्ठ करण्यात यावा , आणि सदर लेखा संहितेमध्ये कोणत्या निरीक्षण अधिकाऱ्याने व किती ग्रामपंचायतीचे निरीक्षण करावे, यासंबंधिची तरतुद प्रस्तावित केली आहे, सदर सुचनांच्या छाननी अंती शासनाने खाली दर्शविलेली ग्रामपंचायत निरीक्षणाची पध्दत अंमलात आणण्याचे ठरविले आहे :-

| अ. क्र. | पदनाम | किमान निरीक्षणे आवश्यक |
|---|---|---|
| १. | विभागिय आयुक्त | दरवर्षी प्रत्येक जिल्हयातील एका ग्रामपंचायतीचे सखोल निरीक्षण |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद | प्रत्येक पंचायत समितीतील एक ग्रामपंचायत किंवा प्रत्येक वर्षात १० ग्रामपंचायती. |
| ३. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद, | अ) माहे जुन आणि सप्टेंबर मध्ये प्रत्येक महिन्यात ५ ग्रामपंचायती ,<br>ब) उर्वरित महिन्यात दरमहा १० ग्रामपंचायती ,<br>क)वरील " अ"आणि "ब"प्रवर्गातील ५० टक्के ग्रामपंचायतीमध्ये सखोल निरीक्षण व उर्वरित ग्रामपंचायतीचे सर्वसाधारण निरीक्षण. |
| ४. | गट विकास अधिकारी | अ) प्रत्येक महिन्यात २ ग्रामपंचायतीचे सखोल निरीक्षण<br>ब) प्रत्येक महिन्यात ८ ग्रामपंचायतीचे सर्वसाधारण निरीक्षण |
| ५. | विस्तार अधिकारी (पंचायत) | प्रत्येक महिन्यात १० ग्रामपंचायतीचे सखोल निरीक्षण |

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी व त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या निरीक्षण अधिकाऱ्याकडुन वर नमुद केल्याप्रमाणे प्रत्येक महिन्यात ग्रामपंचायतीचे सखोल /सर्वसाधारण निरीक्षण करून घ्यावे व विस्तार अधिकारी (पंचायत) ,गट विकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रत्येक वर्षात किती ग्रामपंचायतीचे सखोल/सर्वसाधारण निरीक्षण केले,याबाबतचा परिच्छेद जिल्हा परिषदेमध्ये विभागीय आयुक्ताकडे पाठविण्यात येणाऱ्या एकत्रित अहवालामध्ये समाविष्ट करावा व विभागिय आयुक्तांनी खात्री करावी.

हे आदेश प्रस्तावनेत नमुद केलेल्या दि. ५ जानेवारी,१९७३ मध्ये अंशत: बदल करून निर्गमित केलेले आहेत .इतर सुचनांमध्ये काही एक बदल नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या परिपत्रकातील सुचना सर्वसंबंधितांच्या नजरेस आणण्याच्यादृष्टीने आवश्यक त्या सुचना निर्गमित कराव्यात आणि या परिपत्रकाची पोच द्यावी .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

- स्वा -
(महेश झगडे)
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव,

प्रत,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व कार्यासने.

Scanned by CamScanner